अन्न बहु कुर्वीत तद् व्रतम्

महाराष्ट्र शासन

# महात्मा फुलेकृषि विद्यापीठ, राहुरी

## कार्यालय- कुलसचिव, महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी

दुरध्वनी क्र. ०२४२६-२४३२७३
ई-मेल arismpkv@gmail.com, akmu.mpkv@gov.in

पत्ता :- मध्यवर्ती परिसर, प्रशासकीय इमारत, महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी, ता. राहुरी,जि. अहिल्यानगर. पिन- ४१३७२२.

जा.क्र.कृमाव्यवि/१०० Mbps/दरपत्रके/ १७८ /२०२५

दिनांक : 25 AUG 2025

**प्रति,**

-----------------------------------
-----------------------------------
-----------------------------------

**विषय :** १०० Mbps इंटरनेट लिझ लाईन सेवा सहा (०६) महिने इतक्या कालावधीकरीता पुरविणेसाठी दरपत्रके सादर बाबत...

महोदय,

महात्मा फुले कृषि विद्यापीठाच्या प्रशासकीय इमारतीतील कृषि माहिती व्यवस्थापन विभाग या कार्यालयातुन मध्यवर्ती परीसरातील विविध कार्यालयांना इंटरनेट सुविधा पुरविणेकामी सहा (०६) महिने इतक्या कालावधीसाठी १०० Mbps लिझ लाईन सेवा उपलब्ध करुन देणेसाठी दरपत्रके मागविणेत येत आहे. पुढील नमुद केलेल्या अटी व शर्तीच्या अधिन राहुन दरपत्रके या कार्यालयास सादर करावीत.

| अ.क्र. | कामाचा तपशील |
|---|---|
| ०१ | १०० Mbps लिझ लाईन सेवा सहा महिने इतक्या कालावधीसाठी पुरविणे |

**अटी व शर्ती :**

१. १०० Mbps लिझ लाईन सेवा सहा (०६) महिने इतक्या कालावधीसाठी घेण्यात येणार आहे. पुरवठा आदेश निर्गमित झाले नंतर प्रत्यक्षात इंटरनेट सेवा कार्यान्वित झालेच्या दिवसापासुन सहामाही इंटरनेट सेवेचा कालावधी म्हणुन गणना करण्यात येईल. तसेच सदरील इंटरनेट सेवा पुरविणेसाठी पुरवठादार बंधनकारक राहील.

२. कोणत्या कंपनीची इंटरनेट सेवा पुरविण्यात येणार असल्याचे दरपत्रकात स्पष्ट नमुद करावे.

३. १०० Mbps लिझ लाईन सेवेसाठी लागणारे साहित्य उदा. फायबर केबल व तद्अनुषंगीक उपकरणे इत्यादी उपलब्ध करणे व इंटरनेट सेवा कार्यान्वित करुन देण्याची सर्व जबाबदारी संबंधित पुरवठादार यांची राहील.

४. १०० Mbps लिझ लाईन जोडणीचा आराखडा, माध्यम, इत्यादी याचा दरपत्रकामध्ये सविस्तर उल्लेख करावा. व दरपत्रकामध्ये नमूद केल्याप्रमाणे सदरची जोडणी करण्यात यावी अन्यथा दरपत्रक रद्द करण्यात येईल.

५. १०० Mbps लिझ लाईन सेवेसाठी लागणारे साहित्य, लिझ लाईन Installation Charges इत्यादी बाबींचे दर GST सहीत दरपत्रकात स्पष्टपणे नमुद करण्यात यावेत.

६. पुरवठा आदेश निर्गमित झाल्यापासुन ते सहा (०६) महिने पुर्ण होईपर्यंतच्या कालावधीत पुरवठादार यांचेकडुन पुरविण्यात येणारी इंटरनेट सेवा जेवढे दिवस खंडित राहील तेवढे दिवस / कालावधी वाढवून इंटरनेट सेवा पुरविणे बंधनकारक राहील.

७. दरपत्रकातील दरामध्ये सर्व करांचा समावेश असावा.

८. दरपत्रकाची वैधता स्पष्टपणे नमुद करावी.

९. दरपत्रक स्विकारणे/ नाकारण्याचा अधिकार विद्यापीठाकडे राखून ठेवण्यात आलेला आहे.

१०. दरपत्रकातील नमूद साहित्यांचा वैधता कालावधी (असल्यास) नमूद करावा.

११. कामाच्या देयकाची अदागायी हे इलेक्टॉनिक माध्यमाद्वारेच केली जाईल व सदरील देयकातून आयकर (IT) व स्त्रोतावरील कर कपात (TDS) विहित लेखानियमानुसार कपात करण्यात येईल.

१२. इंटरनेट सेवा पुरविणेबाबतचे दर तिमाही देयक पुरवठादार यांनी या कार्यालयास सादर करावे तदूनंतर तिमाही देयकातील नमूद रक्कम पुरवठादारास इलेक्ट्रॉनिक माध्यमाद्वारेच अदा करण्यात येईल.

१३. सदरील कामांचे देयक तीन प्रतीमध्ये सहाय्यक कुलसचिव (का.व्य.) मफुकृवि, राहुरी यांचे नावे पाठवावे.

सबब, १०० Mbps लिझ लाईन सेवा सहा (०६) महिने इतक्या कालावधीकरीता पुरविणेसाठी आपण आपले दरपत्रक वरील अटी व शर्तीच्या अधिन राहूनच **सहाय्यक कुलसचिव (का.व्य.) मफुकृवि, राहुरी यांचे कार्यालयास दिनांक ०१ / ०१ /२०२५ रोजी पर्यंत** कार्यालयीन वेळेत पाहोचतील अशा बेताने टपालाद्वारे/प्रत्यक्षात पाठविणेत यावेत. दरपत्रकाच्या सिलबंद पाकीटावर "**१०० Mbps लिझ लाईन पुरविण्यासाठीचे दरपत्रक**" असे स्पष्ट नमूद करावे.

**समन्वयक**

**कृषि माहिती व्यवस्थापन विभाग**